म. ग्रं. सं. ठाणे

विषय

लेखक

सन

…लय क्रमांक

पुस्तकाचें नांव

धर्म

सं.ध.१-३

चवथ्या इयत्तेतील शिकणाऱ्या

मुलांकरितां

# विदुरनीतिसार.

## भाग २ रा.

हें पुस्तक,

**गोविंद विष्णु देव,**

यांनीं तयार करून,

बडोदें येथें

"पूर्णचंद्रोदय" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८९९.

किंमत एक आणा.

या पुस्तकासंबंधी सर्व हक्क प्रसिद्ध कर्त्यांनीं स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

प्राचीनकाळचे महा प्रख्यात व निस्पृही तसेच श्रेष्ठ दृष्टी पंडित विदुर महाराज यांचे नीतिसाराचें धोरें क्रमिक पुस्तक, चवथे इयत्तेचे मुलांसाठीं लिहिण्याचें मी हातीं घेतलें आहे.

ह्या पुस्तकाचे धडे दहा केले आहेत. ह्या पुस्तकांतील धडे लहान लहान वाक्याचे नसून, एकाच ठिकाणीं कांहीं वाक्यें घालून व कित्येक ठिकाणीं दोन दोन तीन तीन पारेग्राफ घालून प्रत्येक धडा तयार केला आहे. ह्यांत प्रथम धडा मूर्खमनुष्यांचीं लक्षणें हा आहे.

मूर्ख होण्यास ह्या जगांतील अनुभवाप्रमाणें शिकण्याची किंवा प्रयासानें गुरूपासून ज्ञान संपादन करण्याची मुळींच जरूर नसते. वाईटाकडे मनुष्याची चित्तवृत्ति आपोआप धांव घेत असतेच, पण शहाणें होण्याचा प्रकार त्या उलट आहे, ह्मणून प्रथम पुस्तकांत शहाण्या मनुष्याचे गुणानुवादाच्या सूत्राचे दहा धडे तयार केले आहेत व ह्या पुस्तकांत मूर्ख

मनुष्याचीं लक्षणें लिहून दाखविण्याचा हेतू एवढाच कीं, त्यांतील दुर्गुण वाचून, मनुष्यास आपले दुर्गुणांशीं ताडून पहातां यावें, ह्यासाठीं त्याची सूत्ररूपानें लहान मालिका एकाच ठिकाणीं दिली आहे. ती नेहमीं ध्यानांत धरून, मनुष्यानें दुर्गुणांपासून आपलें वर्तन सुधारावें. दुसऱ्या धड्यापासून ते नवव्या धड्यापर्यंत सुबोध वचनांचीं सूत्रें देऊन, दहाव्या धड्यांत कांहीं कथाभाग लिहिला आहे. पण तो अत्यावश्य व फार महत्वाचा असून, नीतिज्ञानाचा मुख्य पाया जें सत्यभाषण त्याचें अनुकरण, पूर्णपणें शहाणीं मनुष्यें कशा प्रकारें करितात याचें केवळ प्रतिबिंब त्यांत ओतप्रोत भरलें असल्यानें, तो जसाचे तसाच दिला आहे. पांचव्या व सहाव्या इयत्तेच्या विद्यार्थ्यांस, क्रमाक्रमानें चढत्या प्रमाणावर नीतितत्वाचें ज्ञान मिळावें हाही हेतु अधिकाअधिक मनांत वागविला आहे.

नुसता वाक्यरचनेचा क्रम लक्षांत घेतला नाहीं; पण नीतितत्वाची चढती योग्यता ध्यानांत घेतली आहे. जसें, पहिल्या व दुसऱ्या भागांत राज्यनीतितत्वें व तशाच महत्वाच्या गोष्टी लिहिल्या नसून पुढें

येणाऱ्या विदुर नीतिसाराचे तिसऱ्या व चवथ्या पुस्तकांत क्रमाचे प्रमाणानें त्या लिहिण्यांत येतील.

सारांश, विदुरानें धृतराष्ट्रासारखे थोर राजास नीतितत्वें सांगितलीं होतीं. तिची रचना पुढेंमागें जरा फिरवून, लहान वयाचे मुलांपासून ते थोर व होतकरू मनुष्यास उपयोगीं पडण्याच्या हेतूनें हीं क्रमिक पुस्तकें तयार केलीं आहेत. ती रचना, राज्याधिपति श्रीमंत गायकवाड सरकार महाराज साहेब जे ह्या राज्यांतील प्रजाजनाचे पितारूपी असून, विद्यादानाविषयीं ज्यांनीं आपली अखंड कीर्ति जगांत करून ठेविली आहे त्यांस पसंत पडो. तसेंच त्यांच्या राज्यांतील विद्वन्मणी दि. ब. दिवाण साहेबादि विद्वान् अधिकारी मंडळीस पसंत पडून, नीतिज्ञानाचा लोकांत पुष्कळ प्रसार होवो ह्मणजे झालें.

विदुराच्या कण्या जशा श्रीकृष्णानें आवडीनें भक्षण केल्याचें इतिहासप्रसिद्ध आहे, तसें हें विदुरमहाराजांनीं तयार केलेलें नीतितत्वामृत, आमचे प्रजाप्रिय महाराजांनीं स्वतः पिऊन, आपल्या

प्राणप्रिय श्रीमंत युवराज फत्तेसिंगराव महाराजांस पाजावें. तेणेंकरून सर्व प्रजाही पुढें नीतितत्वामृत पिऊन या जगीं कृतार्थ होईल. एवढी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. जसा विद्यालयीं हल्लीं गीतामृत पाजण्याचा क्रम सुरू झालेला दिसत आहे, तसाच त्या ईशप्रेरणेनें त्यांच्या प्रियकर भक्त विदुरमहाराजांच्या नीतितत्वामृतसाराच्या पातळ कण्या, आपल्या प्रजाजनपुत्रांस युवराज आकंठ पान करवोत आणि चिरंजीव होवोत.

मु० बडोदें, तारीख २२-२-९५ इसवी.

पुस्तककर्ता,
गोविंद विष्णु देव.

# विदुरनीतिसार.

## भाग २ रा.

### धडा १ ला.

### मूर्ख मनुष्याचीं लक्षणें.

१. ज्या मनुष्यास लिहितां वाचतां येत नाहीं, ज्यास कोणतेंही शास्त्र येत नाहीं, ज्याला कोणतीही कळा किंवा कुशलतेची विद्या येत नाहीं, ज्यास अहं- कार फार आहे, जो कुकर्मानें द्रव्य संपादन करितो, जो आपल्या जवळचें द्रव्य उधळितो, जो दुसऱ्याचें द्रव्य अयोग्य उपायानें हरण करून घेतो, जो सुमि- त्रांशीं कृत्रिमपणें वागणूक करितो, ज्या पदार्थाची इच्छा करूं नये त्याची इच्छा करितो, जो चांगल्या मित्रांशीं झालेला स्नेह विनाकारण तोडतो, जो आपण केलेलें चांगलें काम ज्यास त्यास सांगत फिरतो, जो दुसऱ्याची गोष्ट पूर्णपणें तपास केल्याशिवाय ती खोटी आहे असें ह्मणून दाखवितो, जो लवकर होणाऱ्या कामाला उगाच उशीर लावितो, त्यास मूर्ख जाणावें.

२. जो मृत पित्रांची आठवण व देवाची भक्ति करीत नाहीं, ज्यास जिवलग मित्र करण्यास कोणी योग्य दिसत नाहीं, जो दुसऱ्याचे घरीं बोलाविल्या-वांचून जातो, जो विचारल्यावांचून मध्येंच बोलतो, जो ठेवूं नये अशा मनुष्यावर विश्वास ठेवितो, ज्याचें चित्त कधींही स्थिर असत नाहीं, जो विचार न करितां दुसऱ्यास दोष देतो, दुसरे ज्या गोष्टीनें दोष देतील त्या गोष्टी आपण करितो, निष्कारण रागा-वतो, आपलें सामर्थ्य किती तें जाणत नाहीं, आपला स्वधर्म कोणता हें ज्यास समजत नाहीं त्यास मूर्ख जाणावें.

३. आपणास मिळण्यास अशक्य अशी वस्तु कांहीं उद्योग केल्यावांचून घेऊं इच्छितो, कृपण मनुष्याचा आश्रय करितो; आपली संपत्ति, वस्त्रें व भूषणें दुसऱ्या निराश्रितांस दिल्याखेरीज आपण एकटाच उपभोगितो, आपले आश्रितांशीं जो परम कृपणपणानें वागतो, जो दुष्ट कर्में करून द्रव्य मिळवितो, त्याच्या द्रव्याचा उपभोग, तो कारागृहीं असतां अथवा मरण पावला असतां दुसरे भोगितात पण तो मात्र दोषास कारण होतो, त्यास मूर्ख जाणावें.

# धडा २ रा.

## सुबोध वचनें.

आपल्या मित्रांस व निरपेक्ष मनुष्यास- मित्राचारानें किंवा सलगीनें आपलेसें करावें. आपले शत्रूस सलगीनें, तसें न बनेल तर लांच देऊन किंवा फितूर करून व शेवटीं युद्ध करून आपले अंकित करावें. आपल्या कल्याणार्थ शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पांच विषय ग्रहण करणारीं इंद्रियें जिंकून, काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या सहांस शत्रु असें जाणावें.

१ परस्त्री, २ द्यूत, ३ जीवहिंसा, ४ मद्यपान, ५ कठोर भाषण, ६ लहान अपराधास कडक शासन ७ दुसऱ्यास पीडा देणें व त्याचें अहित करणें हीं सात जो मनुष्य सोडितो तो सुखी राहील असें समजावें. विष एकास मारतें व शस्त्र एकाचा जिव घेतें; पण राजाची गुह्य गोष्ट फुटली असतां राजा व प्रजा यासुद्धां राज्याचा नाश होतो; ह्मणून राजाची गोष्ट सर्वकाळ गुप्त ठेवावी. ज्यास दुसरी उपमा नाहीं, ज्याचा महिमा अतिश्रेष्ठ, जें स्वर्गाचें

द्वार, भवसागर तरून जाण्यास जणू काय तारूच, असें जें सत्य त्यास कधींही सोडूं नये. क्षमावान् मनुष्य दुसऱ्यास उपद्रव करीत नाहीं ह्मणून त्यांस भितरे ह्मणूं नये. कारण, क्षमा करण्यासारखें मनुष्यास दुसरें भूषण नाहीं. दुर्बळास मदत करणें हा बलवंताचा सद्गुण होय. समर्थानें दुर्बळास क्षमा करणें हें त्यास मोठें भूषण होय. क्षमेनें सर्व जगत् वश होतें व क्षमेनें सर्व प्राप्त होतें. क्षमारूपी शस्त्र ज्याच्ये हातीं आलें त्यास दुर्जन व शत्रु शरण येतात. ज्यास क्षमा नाहीं तो फार क्रूर कर्में करून पश्चात्तापांत व पापांत पडतो आणि अंतीं नरकांत जातो.

---

## धडा ३ रा.

ह्या जगांत दोघेजण आपलें शरीर आपणच सुकवितात; थोडेंही मिळत नसतां मोठा लाभ इच्छितो तो आणि द्रव्य मिळविण्याचें आपले आंगीं सामर्थ्य नसतां मिळत नाहीं ह्मणून रागास चढतो तो. दरिद्री असून दाता आणि राजा असून कृपाळू हे दोघे स्वर्गीं राहतात. कुपात्रीं दान करणें व सत्पात्रीं न देणें ह्या दोन गोष्टी सत्कर्मानें मिळविलेल्या द्रव्याच्या

अमर्यादा होत. काम, क्रोध व लोभ हे तीन अनर्थास कारण होतात; सबब हे तिन्ही अगदीं सोडावे. देवापासून वर मिळणें, राज्यलाभ होणें व पुत्रप्राप्ति होणें हे तीन लाभ श्रेष्ठ मानिले आहेत. यापेक्षांही शत्रूला आपत् काळीं संकटापासून सोडविणें हें अधिक मानिलें आहे. ज्याला आपला असें ह्मटलें, जो आपली एकनिष्ठपणें सेवा करितो व जो आपणास शरण आला ह्या तिघांस कधींही अंतर देऊं नये. मूर्ख, चेंगट, आळशी आणि खुशामती या चौघांबरोबर राजानें मसलत करूं नये. देवानें इच्छिलेली गोष्ट, तपस्वी याचें वाक्य, विद्या असून नम्रता आणि पापकर्म हीं चार तत्काळीं फळ देणारी होत, असें जाणावें. आई, बाप, विवाहांत होम केलेला अग्नि, मनुष्यदेह आणि गुरु हे पांच अग्नि असें मानून त्यांस भजावें. दंभ, मोह, मत्सर, पापकर्म, राजद्वेष, चहाडी, बहुतांशीं वैर आणि मद्यपी, उन्मत्त व दुर्जन यांशीं वाद हीं दहा कर्मे जो सोडितो तो प्रधानाचे पदवीस योग्य होतो. दान, कुलदैवतपूजन, शुभकर्मे व प्रायश्चित्तें हीं जो नित्य करितो त्यास देवही मानितात. जो समानाशीं वाद करितो, मूर्खाशीं करीत नाहीं व गुणवान् पुरुषाचा बहुमान करितो

अशा पुरुषास थोरही मानितात. आपल्या आश्रितांचा समाचार घेऊन स्वतः परिमित भोजन करितो, सर्व कामें परिमित करितो, परिमित निजतो आणि शत्रूनीं जरी याचना केली तथापि सामर्थ्यानुरूप त्यांस मदत देतो त्या पुरुषावर अनर्थ कधींही येत नाहींत.

---

## धडा ४ था.

ज्याचे मनांतील बरी किंवा वाईट गोष्ट इतर लोक जाणत नाहींत, जो आपले मनांतील हेतु नेहमीं गुप्त ठेवितो, कीं जेणेंकरून त्याचें कोणतेंही काम कधींच बिघडत नाहीं. जो सर्व मनुष्यमात्रांचे कल्याणाचा उद्योग करितो, जो सर्वांशीं सत्य आणि मृदु भाषण करितो, जो दुसऱ्याची मानखंडना करीत नाहीं, सर्वांचा अधिकाराप्रमाणें मान ठेवितो, ज्याचें मन सर्वदा सरळ व दयाळू, असा मनुष्य खाणींतील उत्तम रत्नाप्रमाणें शोभतो. आपल्या हातानें चुकून कधीं वाईट कर्म घडलें तरी जो आपला आपणच होऊन लाजतो तो सर्व लोकांमध्यें श्रेष्ठ होतो; कारण अशा पुरुषापासून वाईट कर्म पुनः कधींही घडत

नाहीं. जो प्रतापी असून निरंतर समाधानवृत्तिचा, निर्मळ चित्ताचा असतो तो सर्व लोकांमध्यें सूर्यासारखा शोभतो; अशीं हीं शहाण्या मनुष्याचीं लक्षणें आहेत.

जो विसरलेलें वैर पुनः जागृत करीत नाहीं; गर्वाच्या स्वाधीन होत नाहीं; आपण सर्वोपरी बळवंत असतांही कुकर्म करीत नाहीं; आपणास सुख झालें असतां हर्ष मानीत नाहीं, व दुसऱ्याचें दुःख पाहून ज्याचें चित्त कळवळतें आणि ज्याची बुद्धि उदार, अशा पुरुषास सत्पुरुष ह्मणावें.

जो दुसऱ्याचा द्वेष करीत नाहीं; ज्यास भूतदया आहे; आपण दुर्बळ असून समर्थाचा आव घालीत नाहीं; कोणीही वाईट बोलला तथापि सहन करितो; उद्धटपणा करीत नाहीं; आपला थोरपणा पुढें करून दुसऱ्याचा तिरस्कार करीत नाहीं आणि कोणास कठीण बोलत नाहीं अशा पुरुषाचें सर्व लोक हितच करितात.

---

## धडा ५ वा.

जीं कामें खोट्या उपायांनीं साध्य केलीं, त्यांचा परिणाम अंतीं वाईट होणार असा निश्चय मानून, तशा

अशा ... पुनः आपलें चित्त जाऊं देऊं नये. कोणी ...ल कीं, खोटे उपाय सोडून सरळ मार्गानें कामें केलीं तर त्या सर्वांचा शेवट चांगलाच होतो असा तरी नियम कोठं आहे? पण जेथें उलटा परिणाम दृष्टीस पडतो, तेथें सुज्ञ लोक तो ईश्वरेच्छेनें घडला असें जाणून त्याचा खेद करीत नाहींत.

ज्या कामास जें साहित्य पाहिजे त्याची पूर्वींच योजना करावी; उतावळीनें ज्या त्या कामांत हात घालूं नये. जें काम करावयाचें त्यास साहित्य किती पाहिजे हें पहावें; नंतर त्या कामास आरंभ करावा. आरंभिलेलें काम शेवटास जाईल किंवा नाहीं याचा विचार करून जें शेवटास जाईल असें असेल तेंच करावें.

विद्या, धन व आप्तजनांचें साहित्य हीं तीन गर्विष्ठास प्राप्त झालीं असतां तो अधिक चढून जातो. कांहीं कारणांमुळें सज्जनानें दुर्जनाचा बहुमान केला असतां, तो तितक्यानेंच आपण सज्जन आहों असें मानितो. पण आपला दुर्जनपणा सर्व लोकांस ठाऊक आहे हें त्याचे लक्षांत राहत नाहीं. परंतु हीच सज्जनास अनुकूलता झाली असतां तो अधिक नम्र होतो.

आत्मज्ञान्यास साधु पुरुषावांचून गति नाहीं; साधूंस तर साधुच गति; पण साधूंस असाधूंचा उपयोग होत नाहीं.

चांगलें वस्त्र अंगावर घेणारानें सभा जिंकिली; दुभतें ज्याचे घरांत आहे त्यानें स्वादिष्ट पदार्थ खाण्याची आशा जिंकिली; वाहनावर बसून जाणारानें मार्ग जिंकिला; आणि ज्याचा स्वभाव चांगला त्याणें सर्व जिंकिलें, ह्मणून पुरुषास चांगला स्वभाव असणें हें मुख्य होय. तसा स्वभाव ज्याचा नाहीं त्यास धन, बंधु व जीवीत असून कांहीं उपयोग नाहीं. तीं सर्व व्यर्थ होत.

गरिबांचें जेवण कसेंही जाडेंभरडें असलें तरी त्यांस तें गोड लागतें; कारण मेहेनत त्यांस चांगली भूक उत्पन्न करिते; ती भूक श्रीमंतांस नसते. बहुतकरून श्रीमंतांस भोजनाची शक्ति थोडीच असते. गरिबांनीं मुळ्या, पाला हीं खाल्लीं तथापि तीं त्यांस पचतात. निकृष्ट जन पोट कसें भरेल ह्मणून भितात, मध्यम लोक मरण येईल ह्मणून भितात, आणि उत्तम पुरूष अपमान होईल ह्मणून भितात.

...जिकल्यावांचून बाहेरील शत्रूंस जिंकाव-...च्छितो, त्यास हे अंतस्थ शत्रू अत्यंत प्रतिबंध ...रतात. इंद्रियें जिंकल्यावांचून जे राजे राज्य करितात, ते ऐश्वर्यमदेंकरून राज्यभ्रष्ट होतात. लंकानाथ रावणानें इंद्रियें जिंकिली नाहींत; ह्मणून आतूर होऊन सीतेचें हरण दुष्टपणें केलें, त्या योगानें ऐश्वर्यासहवर्तमान तो प्राणास मुकला.

दुष्ट कर्मे करणाऱ्या मनुष्यांचा चांगल्या मनुष्यानें त्याग न केला, तर पुण्यवानास अगर चांगल्या मनुष्यास, त्या वाईट मनुष्याच्या संगतीनें त्याचे अर्धे दोष व पाप लागतें. जसें, वाळलेल्या लांकडांच्या संगतीनें ओलीं लांकडेंही जळतात. म्हणून वाईट मनुष्यांची संगती चांगल्या व शाहण्या मनुष्यांनीं कदापि करूं नये.

दुष्ट पुरुषाचे ठिकाणीं आठ गुण राहूं शकत नाहींत. दुसऱ्याचें बरें पाहून संतोष मानणें, सरळपणा, निर्मळता, संतोष, गोड भाषण, इंद्रियदमन, सत्य भाषण आणि शांति.

दुष्ट मनुष्य, कठोर भाषण व निंदा यांहींकरून थोरांचा अथवा उत्तम पुरुषाचा छळ करितो. ज्यांची

तो निंदा करितो त्यांच्या पापाचा मात्र तो अधिकारी होतो. आणि ती सहन करणारास दुष्ट मनुष्याचें पुण्य प्राप्त होतें. दुष्ट मनुष्यांजवळ दुसरें बळ नाहीं; दुसऱ्याचा हेवा करावा किंवा घात करावा, हेंच काय तें त्यांचे बळ.

दुष्ट मनुष्यांचे पारिपत्य करणें हें राजाचें बळ, आपल्या पतीची सेवा करून त्याची मर्जी संपादन करावी हें स्त्रियांचें बळ. दुसऱ्याचे अन्याय क्षमा करणें हें शहाण्या मनुष्याचें बळ.

---

## धडा ८ वा.

मोजलेल्या शब्दांनीं भाषण करितां येणें फार अवघड आहे; तसेंच फार बोलून बोलण्यांत अर्थचमत्कार व शब्दचमत्कार न सोडणें हेंही फार अवघड आहे; कधीं कधीं फार बोलणें सर्वथा चांगलें पडत नाहीं. बोलण्यामध्यें चांगल्या शब्दांची योजना केली असतां हितकारक परिणाम होतो आणि वाईट पडले असतां अनर्थ होतो. बाणांनीं छेदलेलें अथवा कुऱ्हाडीनें तोडलेलें रान पुनः पूर्ववत तयार होतें, परंतु वाग्बाणांनीं ह्मणजे कठोर शब्दांनीं जें क्षत पडलें,

## धडा ६ वा.

मद्यपानानें जो उन्मत्त होतो तो कांहीं घटिकांनीं सावध होतो, परंतु ऐश्वर्यमदानें जो उन्मत्त झाला तो दरिद्री झाल्यावांचून सावध होत नाहीं. यास्तव ऐश्वर्य आलें असतां उन्मत्त होणें हें मोठें पापाचें व अनर्थाचें कारण होय असें समजून, उत्तम पुरुष दयाळू व स्नेहाळू स्वभाव धारण करितात.

ज्यानें आपलीं इंद्रियें स्वाधीन ठेविलीं नाहींत, त्याचे आचरणापासून सर्व लोकांस पीडा होते व त्यासही होते. शब्दविषय ह्मणजे मंजुळ शब्देंकरून मन हरण करितात अशा वस्तु, स्पर्शविषय ह्मणजे अंगास लागून सुख देतात अशा वस्तु, रूपविषय ह्मणजे सुंदरपणानें भुलवितात अशा वस्तु, रसविषय ह्मणजे जिव्हेस स्वादिष्ट लागतात अशा वस्तु आणि गंधविषय ह्मणजे सुवास देऊन संतुष्ट करितात अशा वस्तु; ह्या पांचही प्रकारच्या वस्तूंस पंच विषय असें ह्मणतात. हें ज्यानें स्वाधीन ठेविलें नाहींत, त्या पुरुषाच्या विपत्ती, शुद्धपक्षींच्या चंद्राप्रमाणें दिवसेंदिवस अधिक वाढत जातात. मन जिंकिल्यावांचून जो इंद्रियें जिंकावयाची इच्छा करितो, त्यास तींच इंद्रियें

काम व क्रोध ह्या वैऱ्यांचे हातीं देतात; यात्र तो अधि-
पुरुषानें आपलें मन जिंकावें. ज्यानें मन व इंद्रियें ष्ट मनु-
कामक्रोधादि वश केले, व जो कोणतीही गोष्ट पुन्हा
पुनः विचार करून करितो, त्या पुरुषास लक्ष्मी स्वयें
अनुकूल होते. पुरुषाचे शरीरास रथाची उपमा दि-
ल्यास त्याचा सारथी मन होय, आणि इंद्रियें हे
घोडे होत. हे घोडे जर स्वाधीन असतील तर, जसा
कोणी प्रत्यक्ष रथांत बसून जाणारा सुख पावतो, तसा
याचाही आत्मा सुख पावेल.

---

## धडा ७ वा.

जो उचित कर्म सोडून जशी आपल्या इंद्रियांची इच्छा असेल तसा वर्ततो, तो वैभव, प्राण, धन आणि स्त्री यांपासून लवकर भ्रष्ट होतो. जो विषयांचा धनी होतो आणि इंद्रियांचा होत नाहीं, तो इंद्रियें स्वाधीन नाहींत म्हणून धनीपणापासून भ्रष्ट होतो; मन स्वाधीन असलें तर तें मन मित्ररूप होतें आणि स्वाधीन नसलें तर तेंच शत्रुरूप होतें.

वासना आणि राग हे दोघे मुख्य शत्रू होत; त्यांस फार जपावें. जो आपले शरीरांतील वासना, रागादि

तें पुनः पूर्ववत नीट होत नाहीं. प्रत्यक्ष बाण किंवा तरवार शरीरावर मारिली असतां, ती बाहेरून लागते म्हणून तीर अथवा बाण उपसून काढितां येतो, व तलवारीच्या माराचीं क्षतें बाह्य औषध-उपचारांनीं वरीं होतात. परंतु वाग्बाण किंवा कठोर भाषणें शरीरांत शिरून काळजास भोंवतात; म्हणून तीं क्षतें वरीं होत नाहींत. वाग्बाण लागलेले पुरुषास रात्रंदिवस विश्रांती नाहींशी होते. सुज्ञ पुरुष दुसऱ्यास कठोर भाषणांनीं दुखवित नाहींत. महान पंडित विदुर, राजा धृतराष्ट्रास म्हणतो—"तुम्हांपासून पांडवांचे अपराध फार घडले व त्यास कठोर भाषणांनीं तुम्ही फार दुखविलें, शिवाय तुझ्या पुत्रांनीं महासाध्वी द्रौपदीस सभेंत आणून तिची निर्भर्त्सना केली व केंस धरून ओढिले हा मोठा अपराध केला. रावणानें सीतेस हरून मात्र नेली, तितक्यानें तो प्राणास मुकला; आणि तुम्ही पणानें पांडवांचे फार अपराध केले आहेत, आतां तुमचा विनाशकाळ जवळ आला आहे असें मला वाटतें. कारण, ज्याचा विनाशकाळ म्हणजे पडताकाळ जवळ येतो, त्याची बुद्धि भ्रष्ट होते, त्यास वाईट कामें बरींशीं वाटतात, खोट्या गोष्टी खऱ्या भासतात, आणि हितेच्छु मनुष्यानें त्या गोष्टी खोट्या आहेत असें सांगितलें तथापि त्या त्यास खोट्या वाटत नाहींत.

पंडूराजाच्या पुत्रांचा द्वेष व मत्सर तुझ्या पुत्रांनीं केल्यामुळें त्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे. आणि त्यांच्याशीं तूं परम स्नेहभाव ठेविलास ह्मणून तुझेही बुद्धीस विपर्यास पडला, हें तुला कसें समजत नाहीं? तर आतां सकळ राज्यलक्षणांनीं युक्त, त्रैलोक्याचेंही राज्य करावयास समर्थ आणि तुझ्या पुत्रांपेक्षांही तुझी आज्ञा जास्त पाळणारा, त्याच प्रमाणें राज्यारूढ झालेला पंडूचा वडील पुत्र ह्मणून राज्यास अधिकारी असा जो धर्मराज, त्यास राज्यासनीं स्थापण्याविषयीं तुला बुद्धी होवो: धर्मराजाचे गुण किती सांगावे! जो आपलें राज्य दुर्योधन करीत आहे हें प्रत्यक्ष पाहूनही अद्यापि क्षमाच करितो. कारण, युद्ध करण्यास निघाल्यानें लाखों प्राणिमात्रांची हानि होईल व तुझा अपमान होईल, या बुद्धीनें त्यानें तुझे पुत्रांचे हातून पुष्कळ अपमान व दुःखें आजपर्यंत सोशिलीं. तर अशा पुरुषाशीं अतःपर तुझा स्नेह होईल तें त्वां, वडीलपणानें पुढें होऊन करावें असें मला वाटतें.”

---

## धडा ९ वा.

धृतराष्ट्र ह्मणतो, हे विदुरा तूं फार चांगलें भाषण करितोस; त्यामुळें तें ऐकतांना माझी तृप्तिच होत

नाहीं, तर आणखीही कांहीं सांग. हा राजाचा आदर पाहून विदूर ह्मणतो, हे राजा सर्व तीर्थांचे ठायीं स्नान आणि प्राणिमात्रांशीं प्रीति हीं दोन्ही पुण्याविषयीं थोर होत. आणि त्यांतही प्राणिमात्राशीं प्रीति ठेवणें हें सर्व तीर्थस्नानापेक्षां अधिक होय; म्हणून तूं पुत्रासहित कपटवृत्ति सोडून पांडवाशीं स्नेह करून सुखी हो. तेणेंकरून तूं या लोकीं कीर्ति मिळवून, देह सोडिल्यानंतर स्वर्गास जाशील. जों पर्यंत या लोकीं पुरुषाची पुण्यकीर्ति लोकांचे तोंडीं राहते, तोंपर्यंत तो पुरुष स्वर्गीं वास करितो; याविषयीं तुला एक पुरातन कथा सांगतो ती ऐक.

पूर्वीं कोणा एका राजाची केशिनी नामक कन्या रूपानें फार सुंदर होती. आपणास उत्तम पति मिळावा अशी तिची इच्छा आहे, असें तिच्या पित्यानें पाहून तिचें स्वयंवर आरंभिलें. तें ऐकून प्रल्हादाचा पुत्र विरोचन नामा दैत्य, ती स्त्री आपणास प्राप्त व्हावी म्हणून तेथें आला असतां, त्याचा कांहीं छळ करावा म्हणून केशिनी त्यास प्रश्न करिते, हे 'विरोचन, ब्राम्हण श्रेष्ठ कीं दैत्य श्रेष्ठ तें सांग. जर ब्राम्हण श्रेष्ठ म्हणशील तर सर्वांस मान्य अशा राज्यस्थानीं

तुम्ही बसतां, आणि ब्राम्हण कां बसत नाहींत? जर दैत्य थोर म्हणशील तर सर्व लोक ब्राम्हणांची पूजा कां करितात?' हें ऐकून विरोचन उत्तर करितो 'आम्ही विश्वसृष्टया प्रजापतीपासून झालों आहों, आम्हीं सर्वांहून श्रेष्ठ. इतर लोक आम्हांखालीं; आम्हांपुढें देव व ब्राम्हण हे काय पदार्थ आहेत!' तें ऐकून केशिनी ह्मणते, 'या गोष्टीची परीक्षा येथेंच पाहूं. अंगिऱ्याचा पुत्र सुधन्वा ब्राह्मण, उद्यां येथें प्रातःकाळीं येणार आहे, त्या वेळेस तूंही ये.'

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं विरोचन व सुधन्वा हे केशिनीपाशीं आले; तेव्हां ती सुधन्व्यास पाहतांच उभी राहिली, आणि त्यास दर्भासन बसायास देऊन अर्घ्यपाद्यादिकेंकरून त्याची पूजा करिती झाली. तिनें विरोचनास स्वर्णमय आसनावर बसविलें होतें. त्या वेळेस विरोचन आपली थोरवी उघड करावी ह्मणून सुधन्व्यास बोलतो, "हे ब्राह्मणा, तूं तें दर्भासन सोडून मजजवळ या स्वर्णमय आसनावर येऊन बैस." तें ऐकून आणि त्याचे मनांतील अभिप्राय जाणून सुधन्वा उत्तर करितो, "हे विरोचना, मी तुजबरोबर बसावें हें मला उचित नाहीं." तेसमयीं विरोचन क्रो-

धयुक्त होऊन बोलतो, "अरे भट्टा, तूं बोलतोस तेंच खरें, तुझी आमची बरोबरी नाहीं; तूं लांकडाचें तुकड्यावर अथवा गवतावर बसणारा, आणि आम्ही स्वर्णमय आसनावर बसणारे; तस्मात् तूं आणि मी एकत्र बसावें हें मलाच योग्य नाहीं.' तेव्हां सुधन्वा उत्तर करितो, 'हे विरोचना, तुझा बाप प्रल्हाद, मला स्वर्णमय आसनावर बसवून आणि मजपुढें उभा राहून माझी सेवा करितो हें तुला आठवत नाहीं काय?' विरोचन ह्मणतो, "आपले घरीं चालून आला तो श्रेष्ठ मानून त्याचा सत्कार करणें हें थोरांचें लक्षण शास्त्रांत सांगितलें आहे, ह्मणून तुला उच्चस्थानीं बसवून माझा बाप तुजपुढें उभा राहतो; यांत थोरपणा कोणाकडे येतो याचा विचार कर." याप्रमाणें उभयतांचीं उत्तरें व प्रत्युत्तरें झाल्यावर विरोचन बोलतो, हे ब्राह्मणा आह्मी दैत्य सर्वप्रकारें थोर अशी गोष्ट पदरीं घेऊन, अतःपर आपल्या ज्ञातीचे महत्वाचा अभिमान सोड, हें न करशील तर आपण कांहीं तरी द्रव्याचा पण करून तिऱ्हाइतापाशीं जाऊं या; आणि मग तो सांगेल ते उभयतांनीं मान्य करावें." त्यावर सुधन्वा बोलतो, 'आह्मां ब्राह्मणापाशीं द्रव्यसंपात्ति असावयाची नाहीं; तर तुझा आमचा पण हाच कीं,

जो हरेल त्यानें अग्निकाष्टें भक्षावीं. तिन्हाइत कोण म्हणशील तर तुझाच बाप प्रल्हाद. तो सत्यशील आहे, ह्मणून तुजकरितां देखील कधीं खोटें बोलणार नाहीं. विरोचनानें तो पण मान्य केल्यावर ते उभयता प्रल्हादापाशीं गेले. त्या वेळेस प्रल्हादानें सुधन्व्याचा सत्कार करून, येण्याचें कारण विचारिलें. तें सुधन्व्यानें सांगितल्यावर प्रल्हाद बोलतो, हे सुधन्व्या, विरोचन हा माझा एकुलता एक पुत्र, आणि तूं ब्राह्मण महातपस्वी; ह्मणून मला उभयपक्षींही बोलवत नाहीं. तें ऐकून सुधन्वा बोलतो, तूं राजा न्यायकर्ता आहेस, ह्मणून आह्मी उभयता वादी तुजकडे आलों आहों, याचक-रितां पुत्राचें अथवा ब्राह्मणाचें नातें मनांत न आणि-तां सत्य असेल तें बोल; येथें भीड धरशील तर दोषी होशील. तूं पक्षपात न करितां, जें वास्तविक दिसेल तें सांग, तुला भय नाहीं. तें ऐकून प्रल्हाद सुधन्व्यास पुसतो; जो खरें खोटें जाणतों परंतु दोन्ही बोलत नाहीं; अथवा खोटी साक्ष देतो, किंवा खोटा न्याय करितो त्यास काय पातक लागतें आणि त्या पातकापासून या लोकीं किंवा परलोकीं त्यास काय दुःख होतें तें सांग. मग सुधन्वा म्हाणाला, राजा पुढील कथानक सांगतो तें ध्यान देऊन ऐक.

## धडा १० वा.

सुधन्वा राजास म्हणतो, एका पुरुषास दोन स्त्रिया असताना त्यानें एकीवर प्रीति केल्यामुळें जें दुःख दुसरीस होतें; द्यूतांत हरल्यामुळें जें दुःख द्यूत खेळणारास होतें; यजमानानें आज जसें मोठें ओझें डोकीवर दिलें तसें उद्याही देईल, हें मनांत येऊन जें दुःख सेवकास होतें अथवा कोणी एखादा संभावित पुरुष वाट चुकून आणि क्षुधेनें पीडित होऊन एकटा भटकत असतां त्याचे शत्रूंनीं त्यास गाठिल्यामुळें जें दुःख त्यास होतें, तें दुःख खोटी साक्ष देणारास होतें. शेळी इत्यादिक लहान पशूंसाठीं जो असत्य बोलतो, तो आपल्या पांच पूर्वजांसहीत नरकास जातो; मनुष्यासाठीं खोटें बोलतो तो सहस्त्र पूर्वजांसहीत नरकास जातो; गाईसाठीं खोटें बोलतो तो दहा पूर्वज घेऊन नरकास जातो; घोड्यासाठीं खोटें बोलतो तो शंभर पूर्वजासहीत नरकास जातो; जो द्रव्यासाठीं खोटें बोलतो तो पूर्वीं झालेले आणि पुढें होणारे पुरुषांसहित नरकास जातो; आणि भूमीसाठीं खोटें बोलतो त्याचे सर्वस्व नाश पावतें. तसेंच जो खरें खोटें जाणतो परंतु साक्ष देत नाहीं; अथवा काम, क्रोध, लोभ इत्यादिकांच्या आधीन होऊन खऱ्याचा खोटा न्याय

करितो, त्यासही पातक लागून, असेंच दुःख प्राप्त होतें. केशिनी ही उत्पत्ति करण्याविषयीं भूमिसमान आहे, ह्मणून तूं येथें खोटें बोलणें सर्वथा वर्ज करावें. तें ऐकून प्रल्हाद आपल्या पुत्रास ह्मणतो, विरोचना मजपेक्षां सुधन्व्याचा पिता अंगिरा श्रेष्ठ, तुझ्या मातेहून याची माता श्रेष्ठ, आणि तुझ्याहून सुधन्वा श्रेष्ठ आहे. सुधन्व्यानें तुला जिंकिलें. आतां तो तुझ्या प्राणाचा धनी आहे. ह्याप्रमाणें बापाच्या तोंडचीं अक्षरें ऐकून वेरोचन फार खिन्न झाला. तें पाहून प्रल्हाद सुधन्व्याची प्रार्थना करितो, हे ब्राह्मणा, आतां तूं माझा पुत्र मला प्राणासहित कृपा करून दिला पाहिजे हें तुजपाशीं मागतो. तेव्हां सुधन्वा प्रसन्न होऊन ह्मणतो प्रल्हादा, पुत्राची ममता न धरितां सत्यवचन बोललास तस्मात् तूं धन्य आहेस; मी तुझा पुत्र तुला प्राणासहीत दिला. आतां केशिनी याची स्त्री होवो. असा आशिर्वाद देऊन सुधन्वा आपल्या आश्रमास जाता झाला.

याप्रकारें तो प्रल्हाद, पुत्राचा पक्षपात न धरित्यानें पुत्रासहीत सुखी झाला, ही त्याची पुण्यकीर्ति, त्या दिवसापासून सर्व लोक गात आहेत; अशी कथा सांगून विदुर ह्मणतो, राजा, पुत्रास पृथ्वी पाहिजे ह्मणून पृथ्वी मिळावावयासाठीं असत्य बोलून, पुत्र प्रधान यांसहीत आपला नाश करू नको. गोवारी

जसा हातीं काठीं घेऊन गाईस राखितो, तसा देव हातीं काठीं घेऊन सर्व मनुष्यांस राखित नाहींत. ज्या पुरुषास ते राखूं इच्छितात, त्यास उत्तम बुद्धि देतात; ती त्यांची कृपा समजावयाची. ज्या ज्याप्रमाणें मनुष्य चांगलें कर्म करितो, त्या त्या प्रमाणें त्याचे सकल मनोरथ सिद्ध होतात. ज्याचें ब्राह्मणकुळांत जन्म, आणि सर्वकाळ मुखांत वेद, परंतु अंतरी मात्र कपट, अशा पुरुषाचें रक्षण देवाच्यानेंही होत नाहीं. तेथें राजा, तुझी माझी काय कथा? ह्मणून तूं कपट सोड. मद्यपान करणारांशीं गोष्टी करणें, निमित्तावांचून कलह करणें, बहुतांशीं वैर करणें, स्त्रीपुरुषांचा वियोग करणें, कुटुंबांत किंवा जातींत कज्जा लावणें, राजद्वेष करणें, स्त्रीपुरुषांमध्यें वैर उत्पन्न करणें, आणि कुमार्गी जाणें, हीं कामें सर्वथा वर्ज करावीं. साक्षींविषयीं हे सात योजूं नयेत;—सामुद्रिक लक्षण जाणतो तो, मापांत लबाडी करणारा वाणी, जुगारी अथवा फांसे टाकुन शकूनादिक सांगून लोकांस ठकवितो तो, पोटभरू वैद्य, ह्या चौघांचें पैशाकडे लक्ष असतें; ह्मणून यांस वर्ज करावें. त्याप्रमाणेंच कदाचित् विपरीत साक्ष देईल ह्मणून शत्रू, लोकांस खरें वाटणार नाहीं ह्मणून मित्र आणि विपर्यी अथवा कैफी पुरुष, हे सात साक्षी बोलवूं नयेत.

## धडा ६ वा.

मद्यपानानें जो उन्मत्त होतो तो कांहीं घटिकांनीं सावध होतो, परंतु ऐश्वर्यमदानें जो उन्मत्त झाला तो दरिद्री झाल्यावांचून सावध होत नाहीं. यास्तव ऐश्वर्य आलें असतां उन्मत्त होणें हें मोठें पापाचें व अनर्थाचें कारण होय असें समजून, उत्तम पुरुष दयाळू व स्नेहाळू स्वभाव धारण करितात.

ज्यानें आपलीं इंद्रियें स्वाधीन ठेविलीं नाहींत, त्याचे आचरणापासून सर्व लोकांस पीडा होते व त्यासही होते. शब्दविषय ह्मणजे मंजुळ शब्देंकरून मन हरण करितात अशा वस्तु, स्पर्शविषय ह्मणजे अंगास लागून सुख देतात अशा वस्तु, रूपविषय ह्मणजे सुंदरपणानें भुलवितात अशा वस्तु, रसविषय ह्मणजे जिव्हेस स्वादिष्ट लागतात अशा वस्तु आणि गंधविषय ह्मणजे सुवास देऊन संतुष्ट करितात अशा वस्तु; ह्या पांचही प्रकारच्या वस्तूंस पंच विषय असें ह्मणतात. हें ज्यानें स्वाधीन ठेविलें नाहींत, त्या पुरुषाच्या विपत्ती, शुद्धपक्षीच्या चंद्राप्रमाणें दिवसेंदिवस अधिक वाढत जातात. मन जिंकिल्यावांचून जो इंद्रियें जिंकावयाची इच्छा करितो, त्यास तींच इंद्रियें

काम व क्रोध ह्या वैऱ्यांचे हातीं देतात; यास्तव तो अधि-
पुरुषानें आपलें मन जिंकावें. ज्यानें मन व इंद्रियें ष्ट मनु-
कामक्रोधादि वश केले, व जो कोणतीही गोष्ट पुन्हा
पुन: विचार करून करितो, त्या पुरुषास लक्ष्मी स्वयें
अनुकूल होते. पुरुषाचे शरीरास रथाची उपमा दि-
ल्यास त्याचा सारथी मन होय, आणि इंद्रियें हे
घोडे होत. हे घोडे जर स्वाधीन असतील तर, जसा
कोणी प्रत्यक्ष रथांत बसून जाणारा सुख पावतो, तसा
याचाही आत्मा सुख पावेल.

---

## धडा ७ वा.

जो उचित कर्मै सोडून जशी आपल्या इंद्रियांची इच्छा असेल तसा वर्ततो, तो वैभव, प्राण, धन आणि स्त्री यांपासून लवकर भ्रष्ट होतो. जो विषयांचा धनी होतो आणि इंद्रियांचा होत नाहीं, तो इंद्रियें स्वाधीन नाहींत म्हणून धनीपणापासून भ्रष्ट होतो; मन स्वाधीन असलें तर तें मन मित्ररूप होतें आणि स्वाधीन नसलें तर तेंच शत्रुरूप होतें.

वासना आणि राग हे दोघे मुख्य शत्रू होत; त्यांस फार जपावें. जो आपले शरीरांतील वासना, रागादि